**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवादाने कोणाचंही भलं होत नाही, शांतीच्या मार्गानेच विकासाची वाट सोपी होते, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासह घरांचा प्रश्न सोडवण्याच्या संदर्भातले अनेक निर्णय राज्य सरकारकडून जाहीर

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थ्यांना ई-केवायसीमध्ये ३१ डिसेंबरपूर्वी एकदा दुरुस्ती करता येणार

**आणि**

- केरळमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपप्रणित एनडीएचा तिरुवनंतपुरम महानगरपालिकेवर विजय

**<><><><><>**

नक्षलवादाने कोणाचंही भलं होत नाही, शांतीच्या मार्गानेच विकासाची वाट सोपी होते, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. छत्तीसगडमधे बस्तर ऑलिंपिक्सच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते. येत्या ३१ मार्चपर्यंत देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करण्याच्या निर्धाराचा त्यांनी पुनरुच्चार केला.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

छत्तीसगडमधला बस्तर विभाग येत्या ५ वर्षात देशातलं सर्वांत विकसित आदिवासी क्षेत्र करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. सरकारच्या प्रयत्नांमुळे गेल्या २ वर्षात दोन हजारापेक्षा जास्त नक्षली शस्त्रत्याग करुन मुख्य प्रवाहात आले, अशी माहिती त्यांनी दिली. बस्तर ऑलिंपिक क्रीडस्पर्धांमधून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरचे खेळाडू तयार होतील अशी आशा

त्यांनी व्यक्त केली. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उपमुख्यमंत्री अरुण साव आणि विजय शर्मा कार्यक्रमाला उपस्थित होते. बस्तर विभागातल्या ७ जिल्ह्यांमधून सुमारे साडेतीन हजार खेळाडूंनी या स्पर्धांमधे भाग घेतला. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलींचा आणि नक्षली हिंसेचा फटका बसलेल्यांचा त्यात समावेश होता.

**<><><><><>**

मुंबईतल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी हाऊसिंग फॉर ऑल योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. याबाबतचं निवेदन त्यांनी विधीमंडळात सादर केलं. या योजनेत आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी ३०० चौरस फुटापर्यंतचा एफएसआय विनामूल्य तर अल्प उत्पन्न गटासाठी ६०० चौरस फुटापर्यंतच्या सदनिकेची पुनर्बांधणी विनामूल्य करण्याची तरतूद या योजनेत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी शहरात सतरा ठिकाणी समूह पुनर्विकास योजना राबवणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत केली. हाऊसिंग स्टॉकसंदर्भातही त्यांनी महत्त्वाची घोषणा केली.

***होल्ड... बाईट- एकनाथ शिंदे***

नवी मुंबईत वेगवेगळ्या प्रवर्गातल्या घरांसाठी सिडकोनं जे दर निश्चित केले होते, त्यात १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणाही शिंदे यांनी केली. या निर्णयामुळे आता ही घरं पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार आहेत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थ्यांना ई-केवायसी दुरुस्तीसाठी एकच संधी मिळणार असून त्यांनी ती प्रक्रिया ३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण करावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे. या योजनेच्या बहुतांश लाभार्थी या दुर्गम, ग्रामीण भागातल्या असल्यानं ई-केवायसी प्रक्रिया करत असताना काही चूक होणं स्वाभाविक आहे. त्यामुळेच या चुका दुरुस्त करण्याची संधी दिली जात आहे.

<><><><><>

वंदे भारत गाड्यांमध्ये स्थानिक खाद्यपदार्थ देण्यात यावे अशा सूचना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिल्या. IRCTC च्या वेबसाइटवर खाती उघडण्यासाठी कठोर पडताळणी सुरू केल्यापासून नव्या खात्यांची संख्या दैनंदिन १ लाखावरुन ५ हजारापर्यंत कमी झाल्याचं ते म्हणाले. ३ कोटींपेक्षा अधिक बनावट खाती बंद केली असून २ कोटींहून अधिक यूजर आयडी निलंबित केल्याची माहितीही त्यांनी दिली. तिकीट यंत्रणा प्रवाशांकरता सोपी आणि सुलभ असावी, असे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

<><><><><>

प्राप्तिकर भरणाऱ्या करदात्यांनी आपली कर विवरणपत्र अद्ययावत करावीत आणि यापूर्वी काही चुकीचे दावे केले असतील तर ते मागे घ्यावेत, असं आवाहन केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं केलं आहे. करचोरी आणि बोगस परताव्याच्या दाव्यांविरुद्ध मंडळानं कारवाई सुरू केली असून करदाता स्नेही उपाययोजना म्हणून एक मोहीम सुरु केली आहे. त्या अंतर्गत संबंधित करदात्यांना १२ डिसेंबरपासून त्यांच्या मोबाईल आणि ई-मेल आयडीवर सूचना जारी केल्या जात आहेत. काही मध्यस्थांनी चुकीच्या दाव्यांसह विवरणपत्र दाखल करण्यासाठी कमिशनच्या आधारावर संपूर्ण भारतभर आपल्या एजंटांचं जाळं उभारल्याचं निदर्शनाला आल्यानं मंडळानं हे पाऊल उचललं आहे.

<><><><><>

स्टेट बँकेनं मूळ व्याजदरात पाव टक्क्यांची कपात केली आहे. यामुळं बँकेचा रेपो दराशी संलग्न व्याजदर ७ पूर्णांक ९ दशांश टक्के होईल. सोमवारपासून हे नवे दर लागू होतील. यामुळं गृह, वाहन आणि इतर कर्जं स्वस्त होण्याची शक्यता आहे. तसंच मुदत ठेवींवरचे व्याज दरही कमी होतील. इंडियन ओव्हरसीज बँकेनंही रेपो

संलग्न व्याजदर पाव टक्क्यांनी कमी केला आहे. रिझर्व्ह बँकेनं व्याजदर पाव टक्क्यांची कपात केल्यानंतर दोन्ही बँकांनी हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

केरळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं तिरुवनंतपुरम महानगरपालिकेत १०१ पैकी ५० जागा जिंकल्या. त्यासोबतच इतर ठिकाणीही एनडीएनं चांगली कामगिरी केली आहे. सत्ताधारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वातल्या लेफ्ट डेमॉक्रॅटिक फ्रंटला गेल्या वेळच्या तुलनेत बऱ्याच ठिकाणी फटका बसला. काँग्रेसप्रणित युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंटनं ३६७ ग्रामपंचायतींमध्ये बहुमत मिळवलं, तर एलडीएफला २३४ ठिकाणी विजय मिळाला. एनडीएला पाच ग्रामपंचायतींमध्ये बहुमत मिळालं. महानगरपालिकांमध्ये यूडीएफनं तीन ठिकाणी विजय मिळवला. पलक्कड ग्रामपंचायतीत एनडीएनं गेल्या वेळप्रमाणेच चांगली कामगिरी करत ५३ पैकी २५ जागा जिंकून आपली जागा बळकट केली. एकंदर १४ जिल्हा पंचायतींपैकी यूडीएफनं सात, एलडीएफनं सहा जागांवर विजय मिळवला.

<><><><><>

कोलकात्याच्या सॉल्ट लेक मैदानात दिग्गज फुटबॉलपटू लिओनल मेस्सी याच्या आज सकाळच्या कार्यक्रमादरम्यान झालेल्या गोंधळाप्रकरणी पश्चिम बंगाल पोलिसांनी कार्यक्रमाचा आयोजक सताद्रु दत्ता याला अटक केली आहे. मेस्सीला पाहण्यासाठी हजारो चाहत्यांनी गर्दी केली होती. मेस्सीनं चाहत्यांना हात उंचावून अभिवादन केलं. पण तो तिथे काही मिनिटंच थांबून निघून गेला. हजारो रुपयांची तिकिटं काढून आलेल्या चाहत्यांमध्ये यामुळे नाराजी पसरली आणि त्यांनी मैदानाच्या दिशेनं रिकाम्या बाटल्या, खुर्च्या भिरकावल्या. यामुळे तिथे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून प्रेक्षकांना तिकिटाचे पैसे परत करायच्या सूचना दिल्या असल्याची माहिती अतिरिक्त पोलीस

महासंचालक जावेद शमीम यांनी दिली. या घटनेच्या चौकशीसाठी पश्चिम बंगाल सरकारनं निवृत्त न्यायाधीश अशिम कुमार रे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी समाजमाध्यमांवर या घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली. तर केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांता मजुमदार यांनी या घटनेची जबाबदारी स्वीकारून ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

<><><><><>

अरुणाचल प्रदेशच्या अंजव जिल्ह्यात गेल्या सोमवारी झालेल्या अपघाताच्या ठिकाणावरून आज आणखी ११ कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. आसामच्या २२ कामगारांना घेऊन जाणारा मिनीट्रक खोल दरीत कोसळला होता. इथून आत्तापर्यंत १७ मृतदेह बाहेर काढले असून उर्वरित तीन मृतदेह उद्या बाहेर काढण्यात येतील, अशी माहिती अंजवच्या उपायुक्तांनी दिली. एक जण अद्याप बेपत्ता असून त्याचा शोधही उद्या घेतला जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या हवेची गुणवत्ता सातत्यानं बिघडत असल्याच्या पार्श्वभूमीवर वायू गुणवत्ता व्यवस्थापनानं तिथं श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेचा तिसरा टप्पा तत्काळ कार्यान्वित केला आहे. यामधला पहिला आणि दुसरा टप्पा आधीच लागू करण्यात आला आहे. या निर्बंधानुसार आता अनावश्यक बांधकामांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली असून मातीकाम, ढिगारे उपसणं, खंदक खोदणं, मोठ्या दुरुस्त्या आणि पाडकाम यांवरही बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय दिल्लीबाहेर नोंदणी केलेल्या, डिझेलवर चालणाऱ्या बी एस फोर हलक्या वाहनांना दिल्लीत प्रवेश करायला बंदी घालण्यात आली आहे.

<><><><><>

ओदिशा मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या उन्नती हुडा आणि इशाराणी बरुआ या दोघांनी अंतिम फेरीत धडक मारल्यानं भारताचं सुवर्णपदक निश्चित झालं आहे. आज झालेल्या उपांत्य सामन्यात उन्नती हिनं तसनीम मीर हिच्यावर १८-२१, २१-१६, २१-१६ असा विजय मिळवला.

//<><><><><>//